**प्रेसनोट दिनांक १८/०५/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन,पुणे

## शरिरा विरूध्दचे गुन्ह्यातील आरोपीस मा.न्यायालयाने शिक्षा सुनावली.

---

येरवडा पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पैरवी अधिकारी पो.उप.निरी.श्री.राजेंद्र कांबळे, सेशन कोर्ट कर्मचारी पो.हवा. १०८ सुधीर चिकणे, पो.हवा. ५३२४ राजेश शेलार व जेएमएफसी कोर्ट कर्मचारी पो.हवा. ५७३८ राहूल शिंदे यांनी येरवडा पोलीस स्टेशन कडील (१) गुन्हा रजि.नं. ३१३१/२०१२ मुं.पो.ॲ.क. ३७(१),१३५ कोर्ट केस नं. ३२९४/२०१२ तसेच (२) गुन्हा रजि.नं. ३५१/२०१३ भा.दं.वि.क. ३९७,३४ सेशन केस नं. ५०/२०१४ या गुन्ह्यांचे मा.न्यायालयीन सुनावणी दरम्यान, यातील साक्षीदार, पंच यांना योग्य ते संरक्षण दिले, त्यांना वेळचेवेळी मा.कोर्टात सुनावणीसाठी हजर ठेवले, त्यामुळे यातील साक्षीदार, पंचांनी सरकारी पक्षाचे बाजूने साक्ष दिल्याने मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ५, पुणे यांनी वरील पैकी अनुक्रमे गुन्हा रजि.नं. ३१३१/२०१२ यामधील आरोपी- अमोल जिवराज पिल्ले, वय ३७ वर्षे, रा. जयजवाननगर, येरवडा, पुणे यास ४ महिने सक्त मजूरी व २०००/- रू. दंड, दंड न दिल्यास १० दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे. तसेच गुन्हा रजि.नं. ३५१/२०१३ यामधील आरोपी नामे- (१) संतोष गौरव झेंडे, वय ३१ वर्षे, रा. लक्ष्मीनगर येरवडा, पुणे (२) सागर सतिश शिंदे, वय २९ वर्षे, रा. सदर यांना मा.श्री. एस.के.क-हाळे सो. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी ७ वर्षे सक्त मजूरीची शिक्षा सुनावलेली आहे.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे, पैरवी अधिकारी पो.उप.निरी.श्री.राजेंद्र कांबळे, सेशन कोर्ट कर्मचारी पो.हवा. १०८ सुधीर चिकणे, पो.हवा. ५३२४ राजेश शेलार व जेएमएफसी कोर्ट कर्मचारी पो.हवा. ५७३८ राहूल शिंदे यांनी गुन्ह्याचे दोषसिध्दीचे कामी मा.न्यायालयीन प्रक्रिये दरम्यान उल्लेखनिय कामगिरी केली आहे.